जा.क्र.कृसंके/रोवा/५०० /२०२३
कृषि संशोधन केंद्र, पालघर
ता. जि. पालघर
दि. ७/७/2023

प्रति,

मा. प्रभारी अधिकारी
कृषि ज्ञान व्यवस्थापन कक्ष,
डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ,
दापोली जि. रत्नागिरी

विषय :— विद्यापीठ संकेतस्थळावर दरपत्रक मसुदा प्रसिध्द करण्याबाबत .............
संदर्भ :— जा.क्र.डॉबासाकोकृवि/संशो/बियाणे/१२७८/२०२३ दि ३०/०६/२०२३

महोदय,

उपरोक्त संदर्भिय विषयानुसार कृषि संशोधन केंद्र, पालघर जि. पालघर येथे कृषि पिके व मत्स्य बिजोत्पादन परिभ्रमण निधीअंतर्गत सन २०२३–२०२४ या हंगामामध्ये ठेकेदारी पध्दतीने ९५०० नग जांभूळ कलमे बांधावयाची आहेत. सदरची कलमे ठेकापद्धतीने बांधण्यासाठी ठेकेदाराच्याकडून दरपत्रके मागविण्यासाठी मा. कुलगुरू महोदय, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापिठ, दापोली यांनी वरील संदर्भीय पत्रानुसार प्रशासकीय मंजुरी कळविली आहे. तरी आपणास विनंती करण्यात येते की, विद्यापीठाच्या संकेतस्थळावर दरपत्रकाचा मसुदा, कामाच्या अटी व शर्ती प्रसिद्ध करण्यात याव्यात.

आपला विश्वासू

सोबत : वरील प्रमाणे

प्रभारी अधिकारी
कृषि संशोधन केंद्र पालघर
ता. जि. पालघर

प्रत माहितीसाठी सविनय सादर,

१. मा. संशोधन संचालक, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ,दापोली जि. रत्नागिरी
२. मा. संशोधन उपसंचालक (बियाणे), डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ,दापोली जि. रत्नागिरी
३. मा. सहयोगी संशोधन संचालक, प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, पालघर, ता.जि.पालघर

जा.क्र.कृसंके/गोवा/५०१ /२०२३
कृषि संशोधन केंद्र, पालघर
ता. जि. पालघर
दि.

प्रति,

______________________

______________________

______________________

विषय :– ठेकेदारी पध्दतीने जांभूळ कलमे तयार करण्यासाठीचे दरपत्रक पुरविणेबाबत ........

महाशय,

**कृषि संशोधन केंद्र**, पालघर ता. जि. पालघर येथे सन २०२३– २०२४ या कालावधीमध्ये ९५०० नग विक्रीयोग्य जांभूळ कलमे ठेका पद्धतीने तयार करवयाची आहेत. त्यासाठी विक्रीयोग्य प्रति कलम तयार करावयाचा दर नमुद करून बंद लखोटयात या कार्यालयास दिनांक १८/०७/२०२३ पर्यंत पोहचेल अश्या बेताने पाठविण्यात यावा. कलमे तयार करण्यासंबंधीच्या अटी व शर्ती आणि दरपत्रकाचा नमुना फॉर्म विद्यापीठ संकेतस्थळ www.dbskkv.orgवर पहावयास मिळेल. तसेच अनामत रक्कम म्हणून रू. ५,०००/– व पॅन कार्डची छायांकीत प्रत दरपत्रक मंजूर झाल्यानंतर कार्यालयास सादर करणे आवश्यक आहे.

१. दरपत्रकात सर्व करांचा उल्लेख असावा.
२. बंद पाकिटावर 'जांभूळ कलमे तयार करण्याचे दरपत्रक' असा उल्लेख असावा.
३. डाकघराद्वारे दरपत्रक मिळण्यास उशीर झाल्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.
४. कार्यालय कोणतेही कारण न देता आपल्या एकमेव स्वेच्छाधिकारावर हे दरपत्रक रद्द करण्याचा/ मागे घेण्याचा/दुरूस्त करण्याचा किंवा नियत तारीख वाढविण्याचा अधिकार राखुन ठेवत आहे.

आपला विश्वासू

प्रभारी अधिकारी
कृषि संशोधन केंद्र पालघर
ता. जि. पालघर

# कृषि संशोधन केंद्र, पालघर, जि. पालघर

## विक्री योग्य जांभूळ कलमे ठेकेदारी पध्दतीने तयार करावयाच्या कामाच्या निविदेचे अटी व शर्ती

१. दरपत्रकाचे **कोरे फॉर्म** दिनांक १८/०७/२०२३ पर्यंत सकाळी १०.०० वाजेपर्यंत कार्यालयीनवेळेत आणि सार्वजनिक सुट्टीचे दिवस वगळून कार्यालयात उपलब्ध होऊ शकतील.सदर दरपत्रक **सिलबंद** लखोटयामध्ये बंद करून निम्नस्वाक्षरीकार यांचे नांवे सादर करावे.

२. दरपत्रकामध्ये खाडाखोड, बदल किंवा नमूद केलेल्या दराचे व रक्कमेचे आकडे गिरविणे, खाडाखोड करणे इत्यादि गोष्टी आढळून आल्यास निविदा रद्द केली जाईल.

३. दरपत्रक हे विहित फॉर्ममध्ये सादर केली पाहिजे.

४. दरपत्रकातील दर हे सर्व कर जमेस धरून (उदा. विक्रीकर, सर्वसाधारण विक्रीकर, एक्साईज डयुटी, जकात व वहातूक खर्च इत्यादि) असावेत.

५. दरपत्रक भरणाऱ्यांनीदरपत्रकासोबत अनामत रक्कम म्हणून रूपये ५,०००/- (रूपये पाच हजार मात्र) धनादेशाव्दारे भरावी लागणार आहे. धनादेश हा '' डॉ. बाळासाहेबत सावंत कोकण कृषि विद्यापीठ' या नांवे 'पालघर बॅंक शाखेवर देय' असा काढावा.

६. एखादे दरपत्रक उघडया लखोटयातून किंवा उल्लेखित केलेल्या तारखेनंतर अथवा वेळेनंतर आले तर तिचा विचार केला जाणार नाही.

७. स्विकृत निविदा धारकास अटी शर्ती प्रमाणे रूपये १००/- (रूपये शंभर मात्र) किंमतीच्या स्टॅम्प पेपरवरकरारपत्र स्वखर्चाने करावे लागेल.

८. नियमाप्रमाणे आयकराची वसूली देयकातून करण्यात येईल.

९. कोणतेही कारण न देता एक किंवा सर्व दरपत्रके नाकाराण्याचे अधिकार प्रभारी अधिकारी, कृषि संशोधन केंद्र,पालघर कार्यालयाने राखून ठेवले आहेत.

१०. ठेकेदारी क्षमता, विद्यापीठाचा पूर्वानुभव आणि गरज या बाबी लक्षात घेऊन कलमे बांधण्याचे काम वेगवेगळया ठेकेदारांना विभागून देण्याचे अधिकार केंद्र प्रमुखांने राहतील.

११. ठेकेदारी पद्धतीने कलमे बांधण्याचा अनुभव असलेल्या व्यक्तिंना प्राधान्य दिले जाईल अनुभवाचा दाखला सोबत जोडावा.

१२. कलमे करण्याचे दिलेले काम कमीत कमी ८० टक्के पूर्ण करणे आवश्यक आहे. अन्यथा, संबंधित ठेकेदाराची अनामत रक्कम जप्त करणेत येईल. याबाबत केंद्रप्रमुखांनी घेतलेला निर्णय अंतिम आणि बंधनकारक असेल.

१३. ठेकेदाराला विद्यापीठाच्या इतर रोपवाटिकेतून ठेकेदारी घेता येणार नाही तसे समजल्यास त्याच्याकडून काम त्वरीत काढून घेऊन झालेल्या कामाची मजूरी व अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

१४. ठेकेदाराने हजेरी पत्रकावर दररोज सही करणे गरजचे आहे.

१५. ठेकेदाराने आपल्या कामगारांची रोजच्या उपस्थितीची नोंद नावांसह नोंदवहीत करावयाची आहे.

१६. माती वहातूकीपूर्वी मातीचा नमुना संबंधित अधिकाऱ्याला दाखवून पसंत केल्यास नंतरच माती वहातूककरा[illegible] आहे.

१७. प्रत्येक कलमाला पुरविणेत आलेली लेबल्स सुचनेनुसार बांधावयाची आहेत.

१८. कलमे तयार करण्यासाठी वितरीत करण्यात येणारे साहित्य व हत्यारे इ. फक्त ठेकेदारांनाच देण्यात येतील त्यांच्या प्रतिनीधींना देण्यात येणार नाहीत.

१९. ठेकेदारांचा कलमे निर्मितीच्या कामात प्रत्यक्ष सहभाग असणे आवश्यक आहे. कारण मिळालेले काम हे ठेकेदाराचे कौशल्य व इतर माहितीवर आधारीत आहे.

२०. प्राप्त झालेल्या निविदांमधून कमीत कमी दराचे दरपत्रक स्विकारण्यात येईल. असे स्विकृत झालेले कमीत कमी दराचे दरपत्रक ज्या ठेकेदाराचे असेल त्या ठेकेदारास संकल्पीत कामाच्या सर्वसाधारणपणे ४० टक्के, दुसऱ्या क्रमांकाच्या ठेकेदारास सर्वसाधारणपणे ३० टक्के, तिसऱ्या क्रमांकाच्या ठेकेदारास सर्वसाधारणपणे २० टक्के तर चौथ्या क्रमांकाच्या ठेकेदारास सर्वसाधारणपणे १० टक्के काम स्विकृत झालेल्या दराने विभागून देण्यात येईल. तथापि, ठेकेदारांना जांभूळ कलमांच काम विभागून देण्याचा अंतिम निर्णय मा. सहयोगी संशोधन संचालक यांचा राहील. तसेच प्रकल्पग्रस्त ठेकेदार (ज्याची जमीन विद्यापीठ हितार्थ) संपादीत करण्यात आली असा ठेकेदार काम करू इच्छित असेल तर त्याला स्विकृत दर मान्य असेल तर अशा ठेकेदारास ''प्रकल्पग्रस्त'' म्हणून प्राधान्य देण्याच्सा दृष्टीने कलमे तयार करण्याच्या कामात समाविष्ट करून काम विभागून देण्याचे अधिकार विद्यापीठाने राखून ठेवले आहेत. मात्र विद्यापीठ हितार्थ जमीन संपादीत केली असल्यास पुरावा म्हणूनमहसूल खात्याच्या प्राधिकृत अधिकाऱ्याने दिलेल्या दाखल्याची छायांकित प्रत निविदेसोबत सादर करणे आवश्यक आहे.

२१.जांभूळ कलमांसाठी प्लॅस्टिक पिशव्यामाती व बियांची/रोपे व्यवस्था ठेकेदाराने स्वत: करावयाची आहे.

२२. जांभुळ कलमे बांधण्याचे काम डिसेंबर महिन्यापूर्वी करावयाचे आहे. मातृवृक्ष बागेतील अंकुर काडया स्वत: ठेकेदाराने काढुन घ्यावयाची आहेत व त्याची नोंद संबंधित कर्मचाऱ्याकडे द्यावयाची आहे. सदर दिलेल्या मुदतीनंतर जांभूळ कलमकाडया पुरविल्या जाणार नाहीत. तसेच ३१ मे अखेरपर्यंत कलमांची निगा ठेकेदारांनीच करावयाची आहे.

२३. कलमे बांधण्यासाठी लागणारी माती उत्खनन करून आणवयाची झाल्यास त्यापोटी देय होणारी सर्व रॉयल्टी व इतर कर या संबंधातील आदायगी ठेकेदारास करणे बंधनकारक राहील.

२४. या कार्यालयार्फत ठेकेदारास फक्त जागा, पाणी, शेड, शेडनेट, अंकुर काडया इ. पुरविण्यात येतील.

प्रभारी अधिकारी
कृषि संशोधन केंद्र, पालघर,
जि. पालघर.

दरपत्रक

विक्रीयोग्य जांभूळ कलमे तयार करण्याचे दरपत्रक

दि.

प्रति,

मा. प्रभारी अधिकारी
कृषि संशोधन केंद्र, पालघर
ता. जि. पालघर

विषय :— सन २०२३— २०२४ या हंगामात विक्री योग्य जांभूळ कलमे तयार करण्यासाठीचे दरपत्रक .......

महोदय,

कृषि संशोधन केंद्र, पालघर ता. जि. पालघर येथे सन २०२३— २०२४ या हंगामात ९५०० नग विक्री योग्य जांभूळ कलमे तयार करून देण्यासाठी मी खालील प्रमाणे दर देत आहे.

| कलमांचा प्रकार | दर प्रती कलम (रू.) |
| --- | --- |
| | |

(अक्षरी रूपये ..........................................................................................................)

मी जांभूळ कलमे तयार करण्याबाबतच्या अटी व शर्ती वाचल्या असून त्या मला मान्य आहेत व त्या माझ्यावर बंधनकारक राहतील अटी व शर्तीचे मी काटेकोरपणे पालन करीन त्यानुसारच मी वरीलप्रमाणे दर देत आहे.

आपला विश्वासू

ठेकेदाराचे पूर्ण व पत्ता

______________________

______________________

______________________

______________________